# पुणे महानगरपालिका

## इंग्रजी माध्यम करार पद्धतीवरील
## शिक्षक भरती जाहिरात
## शिक्षण विभाग प्राथमिक
## कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
## शिवाजीनगर, पुणे-०५

- शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका संचालित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी सन २०२२-२३ करिता तात्पुरत्या स्वरूपात केवळ सहा महिनेपेक्षा कमी कालावधीकरिता दरमहा एकवट मानधन रक्कम रुपये १५०००/- (अक्षरी पंधरा हजार रुपये फक्त) वर करार पद्धतीवरील इंग्रजी माध्यम प्राथमिक शिक्षक या पदाकरिता निवड, प्रतीक्षा यादी, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे नेमणूक करण्यात येणार आहे.
- शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व प्राधान्यक्रमाने खालीलप्रमाणे निश्चित केली जाईल.

१) इयत्ता १ ली ते १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड./ बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

२) इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत इंग्रजी, १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड./ बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

३) इयत्ता १ ली ते १० वी मराठी अथवा इतर माध्यमातून व १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड./बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

४) इयत्ता १ ली ते १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड./ बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

५) वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/

डी.एड./ बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

५) वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/ सीटीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील. टीईटी/ सीटीईटी उत्तीर्ण नसलेल्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**एकूण पदे- १०४**

| अ जा | अ ज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमा व | ईडब्ल्यु एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | १३ | १ | १ | २ | ० | १ | २९ | २१ | १५ | १०४ |

- उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून सात दिवसांपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते २.०० या वेळेपर्यंत हस्त पोहोच शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ०५ येथे अर्ज स्वीकारण्यात येतील. पोस्टाने/टपालाने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांनी त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत घेऊन यावीत.
- सविस्तर माहिती व जाहिरात **https://www.pmc.gov.in/en/recruitments** या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी वरील वेबसाईटचे अवलोकन करावे.

**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**